अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांनी जातीचा दावा वैध / अवैध ठरविताना करावयाच्या कार्यपध्दतीबाबत...

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक :- एसटीसी-१००९/प्र.क्र.१७९/का.१०

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- ७ ऑक्टोबर २००९.

प रि प त्र क

प्रस्तावना :- श्री.योगेश शांताराम मोरे यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ६२९६/२००९ दाखल केलेली आहे. या याचिकेसंदर्भात दि. १०/०९/२००९ रोजी झालेल्या सुनावणीत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कामकाजासंदर्भात खालील बाबी मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आल्या आहेत :-

१) जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांनी बहुतांशी प्रकरणात दिलेले निर्णय हे कोणतीही कारणमिमांसा न देता दिलेले आहेत.

२) सन २००१ ते २००९ या कालावधीमध्ये दक्षता समितीकडे सोपविण्यात आलेल्या व निर्णय घेण्यात आलेल्या २२५५ प्रकरणांच्या निर्णयांत शंकास्पद बाबी आढळून आल्या आहेत.

३) समित्यांकडे मोठया प्रमाणात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी समित्यांच्या सदस्यांनी ११.०० त ५.०० या कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून फक्त जात प्रमाणपत्र तपासणी समितीचे कामकाज पाहणे अपेक्षित आहे.

४) समित्यांनी दिलेले इंग्रजी भाषेतील निर्णय हे समितीच्या कोणत्या सदस्याने कोणाकडून लिहून घेतलेले आहेत याबाबतची नोंद ठेवण्यात आलेली नाही. सदर निर्णय समितीच्या एखादया सदस्याने लिहिण्याबाबत सर्व सदस्यांमध्ये एकमत झाले होते किंवा कसे ही बाब पडताळून पहाता येत नाही.

५) समितीच्या निर्णयाची प्रत विद्यार्थ्यांना केव्हा देण्यात आलेली आहे याबाबतची नोंद, दैनंदिन नोंद वहीत आढळून येत नाही.

२. तसेच जाती प्रमाणपत्र तपासणी करताना आवश्यक ती कार्यपध्दती अमलात आणली जात नाही असेही मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.६२९६/२००९ प्रकरणीच्या न्यायनिवाडयात नमूद केले आहे. त्यासंदर्भात त्यांनी सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांनी कोणती कार्यपध्दती अमलात आणावी याबाबत सविस्तर सूचना केलेल्या आहेत. सदरच्या सूचना सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांना कळविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

परिपत्रक :- राज्यातील अनुसूचित जमातीच्या सर्व उमेदवारांचे जातीचे दावे तपासण्यासाठी राज्यात एकूण आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे गठन करण्यात आले असून त्यांचे कार्यक्षेत्र विविध ठिकाणी ठेवण्यात आलेले आहे. मा.उच्च न्यायालयाने, जातीचे प्रमाणपत्र वैध वा अवैध ठरविताना सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांनी, खालीलप्रमाणे कार्यपध्दती अमलात आणावी अशाप्रकारचे निर्देश दिले आहेत :-

१) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे प्रकरण प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून प्रकरण निकाली काढेपर्यंत होण्या-या कार्यवाहीच्या नोदींची सविस्तर माहिती दैनंदिनी नोदवहीत (Roznama) अद्ययावत ठेवण्यात यावी.

२) सदर दैनंदिनी (Roznama) मध्ये दिनांक निहाय प्रकरणासंदर्भात अनुसूचित जमाती तपासणी समितीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात यावी व सदर दैनंदिनी तपासणी समितीच्या सर्व सदस्यांनी स्वाक्षरीत करावी.

३) संबंधीत पक्षकाराने सादर केलेली कागदपत्रे कोणत्या तारखेला सादर केली याची सविस्तर नोंद दैनंदिनी (Roznama) मध्ये घेण्यात यावी.

४) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने संबधीत कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर त्यांचे समाधान न झाल्यास ती दक्षता पथकाकडे चौकशीसाठी सोपविल्यास त्याबाबतची सविस्तर कारणे सदर दैनंदिनीत (Roznama) नमूद करावीत.

५) सादर केलेल्या कागदपत्रावरुन तपासणी समितीचे समाधान झाल्यास ती दक्षता पथकाकडे न पाठवता जात वैधता प्रमाणपत्र प्रदान करण्याचा / न करण्याचा निर्णय घेऊन समितीने त्यावर घेतलेला निर्णय सकारण दैनंदिनीत (Roznama) नोंदवावा.

६) दक्षता पथकाकडे प्रकरण सोपविण्याचा निर्णय झाल्यास अशा निर्णयापासून एका आठवडयाच्या आत सदर प्रकरण दक्षता पथकाकडे सोपविण्यात यावे. दक्षता पथकाने अशारितीने सोपविलेल्या प्रकरणांची चौकशी पूर्ण करुन त्यांचा अहवाल सहा आठवडयात अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे सादर करावा.

७) दक्षता पथकाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने त्याबाबतची नोंद दैनंदिनीमध्ये घ्यावी. सदर अहवाल प्रतिकुल असल्यास त्याची देखील नोंद दैनंदिनीमध्ये घेऊन हा अहवाल नोंदणीकृत देय डाकेने संबंधित उमेदवारास पाठवावा व याचीदेखील दैनंदिनीमध्ये नोंद घेण्यात यावी. यानंतर उमेदवार आणखीन नवीन पुरावे देण्यासाठी पुढे आल्यास त्याने त्याबाबत समितीकडे लेखी अर्ज करावा आणि त्यानंतर नियमाप्रमाणे या पुराव्यांची नोंद करुन घेण्यात यावी.

८) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून प्रकरणांची अंतिम सुनावणी झाल्यानंतर समितीच्या सर्व सदस्यांची बैठक घेण्यात यावी व वैध प्रमाणपत्र देण्यात यावे किंवा कसे याबाबत सर्वसाधारण एकमत करण्यात यावे व त्यानंतर लेखी आदेश निर्गमित करण्याची जबाबदारी एका सदस्यावर सोपविण्यात यावी. जात वैधतेबाबत सदस्यांमध्ये मतभेद असल्यास बहुमत असलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याने लेखी आदेश निर्गमित करावे. अल्प मत असल्यास त्याची नोंदही संबंधित सदस्याने घ्यावी. ज्या सदस्याने लेखी आदेश निर्गमित केले आहेत त्यांचे नाव दैनंदिनीमध्ये नमूद करण्यात यावे व अशा सदस्याचे नाव लेखी आदेशात निर्णयाच्या दिनांकासह पहिल्या पृष्ठावर स्पष्टपणे नमूद करावे. सदर निर्णय संबंधित उमेदवाराला केव्हा देण्यात आला याबाबतची नोद दैनंदिनी (Roznama) मध्ये घेण्यात यावी.

९) एखाद्या निर्णयाबाबतची कार्यवाही संबधीत दिवशी पूर्ण न झाल्यास तपासणी समितीस त्यादिवशीची कार्यवाही संस्थगित करुन दुस-या दिवशी ही कार्यवाही पूर्ण करावी.

१०) निश्चित केलेल्या दिवशी निर्णय कां देता आला नाही याची कारणे दैनंदिनीमध्ये (Roznama) नोंदविण्यात यावीत.

२. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या वरील निर्देशांनुसार सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांनी कामकाज करावे असे आदेश या परिपत्रकाव्दारे देण्यात येत आहेत. तसेच कामकाजाच्या वेळी, आवश्यकता भासल्यास, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी इंग्रजी भाषेत दिलेल्या दिनांक १०.९.२००९ च्या न्यायनिर्णयातील (प्रत सोबत जोडली आहे) आदेशांचे पालन करण्यात यावे.

३.	सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक **२००९१००७१६५५०७००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ग. गो. पंचभाई)
शासनाचे सह सचिव

प्रति :-

१) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१.

२) सहआयुक्त तथा उपाध्याक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, तिसरा मजला, वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, कोरस कंपनीसमोर, वर्तकनगर, ठाणे (प.)- ४००६०६.

३) सहआयुक्त तथा उपाध्याक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक.

४) सहआयुक्त तथा उपाध्याक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती पुणे-४११ ००१.

५) सहआयुक्त तथा उपाध्याक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती काश्मिरा भवन, सेवायोजन कार्यालयाजवळ, स्टेशन रोड, औरंगाबाद-४३१ ००१.

६) सहआयुक्त तथा उपाध्याक्ष,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, सेवायोजन कार्यालयासमोर, इर्विन चौक, अमरावती-४४४ ६०१.

७) सहआयुक्त तथा उपाध्याक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर.

८) सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदुरबार शीतकरण केंद्राची इमारत, R.T.O. ऑफीस शेजारी, साखरी रोड, नंदुरबार, जि.नंदुरबार.

९) सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली प्रकल्प कार्यालयाशेजारी, कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि.गडचिरोली.

१०) उप सचिव, विधी, आदिवासी विकास विभाग (का.४) मंत्रालय, मुंबई-३२.

११) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१२) मा.सरकारी अभियोक्ता, रिट सेल (ए.एस.), रुन नं.४, तळ मजला, पी.डब्ल्यु.डी.बिल्डींग, मुंबई, मा.उच्च न्यायालय, मुंबई.

१३) निवड नस्ती (का.१०), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

COURT MATTER

VERY URGENT

Tel - 22677694, Fax -22673093

NO. GP/WP/CRS/

Officer of the :

Government Pleader, HighCourt

A.S. (Writ Cell), P.W.D. Bldg.,

Gr. Floor, Mumbai-400 032.

Date: 17.09.2009

To

The Member Secretary

Scheduled Tribe Verification Caste Scrutiny Committee

Konkan Division, Thane, having its office at Vartak Naar

Ward Committee Office, Vedant Complex,

Opp. Kores Company, Vartak Nagar, Wagle Estate, Thane.

The Dy. Director ® and The Member Secretary

Scheduled Tribe Certificate Scrutiny Committee

Nashik Division, At. Adivasi Vikas Bhavan

Old Agra Road, Nashik

The Dy. Director ® and The Member Secretary

Scheduled Tribe Certificate Scrutiny Committee

Pune Division, 28, Queens Garden

Pune-411 001.

The Dy. Director ® and The Member Secretary

Scheduled Tribe Certificate Scrutiny Committee

Milk Refrigeration Centre Building

Near RTO Office, Sakhari Road, Nandurbar

The Dy. Director ® and The Member Secretary

Scheduled Tribe Certificate Scrutiny Committee

Kashmira Bhavan, Near Employment Exchange

Station Road, Aurangabad-431 001

The Dy. Director ® and The Member Secretary

Scheduled Tribe Certificate Scrutiny Committee

Near Employment Exchange, Irvin Chowk

Amravati-440 601

vdg

The Dy. Director (R) and The Member Secretary
Scheduled Tribe Certificate Scrutiny Committee
Adivasi Vikas Bhavan, Giripeth, Amravati Road,
Nagpur 440 010

The Dy. Director (R) and The Member Secretary
Scheduled Tribe Certificate Scrutiny Committee
Gadchiroli, Near Tribal Development Project
Gadchiroli Complex, Gadchiroli

The Secretary to the Government
Tribal Development Department
Mantralaya, Mumbai

The Secretary to the Government
Social Welfare Department
Mantralaya, Mumbai

Sub: High Court, A.S. (Writ Cell),
Writ Petition No.6296 of 2009
Yogesh S. M[illegible]e
Versus
The State of Maharashtra & Ors.,

Sirs,

The above mentioned Writ Petition came up for admission and interim reliefs before the Hon'ble Court of Their Lordships MR. Justice S.B. Mhase and R.M. Savant on 10.09.2009. After hearing the advocate for the respective parties and Government Pleader, Mr. V.S. Masurkar (G.P.) with Assistant Government Pleader (A.G.P.) Mr C.R. Sonawane, for the State, the Hon'ble Court is passed an order which is enclosed hereto for your compliance. The Hon'ble Court is adjourned the matter to 08.10.2009.

Yours faithfully,

(C.R. Sonawane)
Assistant Government Pleader, A.S. (Writ Cell),
High Court, Mumbai

Copy to,
[illegible]
The Under Secretary to Government,
Law & Judiciary Dept., Mantralaya, Mumbai - 32.

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
CIVIL APPELLATE JURISDICTION

WRIT PETITION NO.6296 OF 2009

Yogesh Shantaram More ..Petitioner

V/s.

The State of Maharashtra & ors ..Respondents

Mr.R.K.Mendadkar, Advocate, for the petitioner
Mr.Vinay Masurkar, Government Pleader
a/w.Mr.C.R.Sonawane, Assistant Government Pleader,
for the State

CORAM : S.B.MHASE &
R.M.SAVANT, JJ.

DATE : 10TH SEPTEMBER, 2009

P.C.

. The procedure which is followed by the Caste Scrutiny Committee for invalidation of the Caste Certificate is reported to be illegal and bad in law. We have also perused the tabular Statements giving the statistics of the pending cases which are produced before us. They also show that a large number of cases are decided without giving any reason. From the year 2001 to 2009 only

2255 cases are decided with vigilance enquiry itself creates a doubt. In view of the large pendency of the cases it is expected that the members of the Caste Scrutiny Committee should sit from 11.00 A.M. to 5.00 P.M. dealing with the Caste cases as ultimately the Order passed by the Scrutiny Committee is relevant for the candidate either for the Educational Qualification and/or continuation of service or for holding elective office. It has also serious implications on the Society so far as the cases referred are concerned. We have also noted that the Judgments which are written by the Scrutiny Committee are in English. When we asked the learned Assistant Government Pleader we are informed that English Stenographers have not been provided to them. Apart from that, the Orders do not disclose as to which Member of the Committee has written the Order. It is also not revealed from the Roznama of the case, whether all the members came to a consensus and thereafter, the matter has been handed over to one of the

members for writing the Order. If the name of the member is disclosed showing that he has written the Order then he would be responsible for the same and the other members would be responsible for concurring with the said Order. It has been further noted that Roznama some times does not disclose the date on which the Judgment is given to the candidate. This also is required to be regulated. Under these circumstances, we direct the concerned Department of the State Government to issue directions to all the Caste Scrutiny Committees in the State of Maharashtra to the following effect :-

> (i)From the first day on which the Scrutiny Committee receives the case, proper Roznama should be maintained by it.
>
> (ii)The Roznama should show that what work was carried out by it on a particular day and it should be signed by all the members of the Scrutiny Committee and not only the President.
>
> (iii)Roznama should also show that which party has produced which document and on what date it has been produced.
>
> (iv)The Roznama should show that when the Scrutiny of the documents was carried out

by the Scrutiny Committee sitting together and if it is not satisfied and directs the Vigilance Cell Enquiry, the reason for their non-satisfaction should be reflected in the Roznama. We have noticed that nothing is recorded by the Caste Scrutiny Committee, in the event it is not satisfied with the documents produced by the candidate, who has approached the Caste Scrutiny Committee for validation of the Caste Certificate.

(v)Even if the Caste Scrutiny Committee is satisfied and decides to issue validity Certificate without directing the Vigilance Cell Enquiry it shall pass an appropriate reasoned Order regarding its decision, which is in favour of the candidate.

(vi)If it is satisfied that the matter should be referred to the Vigilance Cell, it should accordingly within a week from the said decision, refer it to the Vigilance Cell and the Vigilance Cell upon such reference should complete the enquiry and submit a Report within a period of six weeks to the Caste Scrutiny Committee. We have noted that considerable time is being taken by the Vigilance Cell which cannot be justified under any circumstances.

(vii)After the receipt of the Vigilance Cell Report, the Caste Scrutiny Committee should make an entry in the Roznama and if the Vigilance Cell Report is adverse, that entry should be made in the Roznama. The said Report should be furnished to the candidate by R.P.A.D and acknowledgement received by the Caste Scrutiny Committee signed by the concerned candidate should also be reflected in the Roznama.

Thereafter, if the candidate approaches it for leading any evidence the candidate should make an application mentioning that he wants to lead evidence and submit his list of witnesses. Thereafter, the evidence shall be recorded in accordance with law.

(viii)After conclusion of the hearing of the case the Caste Scrutiny Committee shall have a meeting of the members of the said Caste Scrutiny Committee and shall come to a general consensus as to whether Validity Certificate should be issued or not and thereafter, the work of writing of the Order to one of the members should be assigned and if there is a difference of opinion amongst the members of the Committee then the members, who in majority side, on their behalf one of the members should write the Order. The minority view should also be written by one of the members. The person who has written the Order his name should be reflected in the Roznama stating that so and so has written the said Order and his name should also be mentioned on the front page of the Order. The front page should also disclose the date of the decision. The Roznama should also disclose the date on which the Judgment is given to the concerned candidate.

(ix)If for any reason the Judgment is not completed on a particular day, the Scrutiny Committee may adjourn it for the said purpose.

(x)The reason as to why Judgment is not pronounced on given date should also be reflected in the Roznama.

2. For the compliance of this Order, the above Writ Petition is kept pending. It would be disposed of only after the report of the compliance of the above directions.

3. Stand over to 5th October, 2009.

(R.M.SAVANT, J.) **(S.B.MHASE, J.)**